# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.12.2024** **वार– गुरुवार**

---

**हायड्रो परिषद**

केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र आणि इंडियन सोसायटी फॉर हायड्रोलिक्स यांच्या संयुक्त विद्यमानं पुण्यात "हायड्रॉलिक्स, वॉटर रिसोर्सेस, रिव्हर आणि कोस्टल इंजिनिअरिंग – HYDRO 2024 इंटरनॅशनल" या विषयावरच्या २९ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील, यांनी आज दूरस्थ पद्धतीनं परिषदेचं उद्घाटन केलं. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेमधे हायड्रोलिक्स, जलस्रोत, नदी अभियांत्रिकी आणि किनारपट्टी व्यवस्थापनाशी संबंधित विविध विषयांवर आमंत्रितांची व्याख्यानं, शोधनिबंधांचं सादरीकरण, चर्चा होणार आहे

**सवाई गंधर्व**

७०व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवात काल आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीनं देण्यात येणारा वत्सलाताई भीमसेन जोशी पुरस्कार सवाई गंधर्व यांचे नातू आणि भारतरत्न भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ शिष्य दिवंगत श्रीकांत देशपांडे यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला.त्यांच्या पत्नी शीला देशपांडे यांनी हा पुरस्कार स्विकारला.५१ हजार रूपये,मानपत्र आणि मानचिन्ह अस त्याचं स्वरूप आहे. सवाई गंधर्व महोत्सव हा आमच्या गुरूपरंपरेचा महोत्सव आहे.सवाई गंधर्वांचे नातू आणि भीमसेनजींचे शिष्य

असलेले श्रीकांत देशपांडे यांचे आयुष्य संगीतसेवेसाठी समर्पित होत, त्याचा सन्मान या पुरस्काराच्या रूपाने करण्यात येत आहे असं श्रीनिवास जोशी यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान कालच्या सत्रात ज्येष्ठ छायाचित्रकार सतीश पाकणीकर यांची निर्मिती असलेल्या ध्रुपद गायक कलाकार या विषयावरील २०२५ या वर्षाच्या दिनदर्शिकेच प्रकाशन ज्येष्ठ गायक पंडित अजय चक्रवर्ती यांच्या हस्ते झालं .या दिनदर्शिका निर्मिती मध्ये महत्वाचा वाटा असणारे ध्रुपदगायक पं उदय भवाळकर यावेळी उपस्थित होते.

**ससूनमागणी**

पुण्यातील ससून रुग्णालयात मुख्यमंत्री सहायता निधीचं मध्यवर्ती मदत आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात यावं, अशी मागणी आमदार सुनील कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या अर्जासाठी लागणाऱ्या शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांच्या सही-शिक्क्यासाठी मोठी गर्दी असते. या सर्वांचा विचार करत ससून सर्वोपचार रुग्णालयात पुणे शहर आणि जिल्ह्यासाठी म्हणून मध्यवर्ती मदत आणि मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात यावं. असं आमदार कांबळे यांनी म्हटलं आहे.

**अवयवदानमुळे जीवन**

पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या राजस्थानच्या पोखरण इथल्या २१ वर्षीय विद्यार्थिनीचा ९ डिसेंबर रोजी अपघात झाला, त्यामध्ये ती गंभीर जखमी झाल्यानं तिला एका खाजगी रुग्णालयात दाखल केलं होतं.. गेले अनेक दिवस ती कोमात होती. मंगळवारी तिची प्राणज्योत मालवली. त्यानंतर तिच्या पालकांनी तिचे अवयवदान करण्याचा निर्णय घेऊन तिचं हृदय, यकृत, दोन्ही किडनी, स्वादुपिंड असे अवयव दान

करण्यात आले. त्यामुळे पाच जणांना नवजीवन मिळणार असल्याची माहिती प्रादेशिक प्रत्यारोपण समन्वय समितीच्या आरती गोखले यांनी दिली.

**आरोग्य चित्रपट महोत्सव**

आरोग्य जागृतीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या पी.एम.शाह फाऊंडेशन या पुण्यातल्या संस्थेच्यावतीनं आरोग्य समस्यांवर आधारित चित्रपटांच्या राष्ट्रीय महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात उद्या आणि परवा म्हणजे २० आणि २१ डिसेंबर हा महोत्सव पार पडणार आहे. या राष्ट्रीय आरोग्य चित्रपट महोत्सवाचं उदघाटन मेंदूविकार तज्ज्ञ पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या हस्ते होणार आहे. तर २१ डिसेंबरला अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप आणि पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

**गाय अनुदान**

गायीच्या दुधासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदान वाटपात पुणे जिल्हा आघाडीवर असून आतापर्यंत राज्यात वितरित झालेल्या ५३४ कोटी १७ लाख रुपये अनुदानापैकी १६९ कोटी ८२ लाख रुपये पुणे जिल्ह्यातील दूध उत्पादकांना मिळाले आहेत.

**कुराश**

आंतरराष्ट्रीय कुराश असोसिएशनच्या वतीनं मंगोलियात घेण्यात आलेल्या जागतिक कुराश अर्थात रशियन कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुण्यातील डॉ. संतोष तेली यांनी पहिल्यांदाच सुवर्णपदक पटकविले. त्यानिमित्त कुराश असोसिएशन ऑफ महाराष्ट्रातर्फे डॉ. संतोष तेली यांचा सत्कार करण्यात आला. अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या हस्ते डॉ. तेली यांचा सत्कार करण्यात आला. तेली यांनी वरिष्ठ, ६५ किलो वजनी गटात ही चमकदार कामगिरी केली.

डी.एस.के. करंडक'   आंतर-शालेय क्रिडा स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये १०० मीटर धावण्याची शर्यत पार पडली. १२ वर्षाखालील गटात  स्पृहा पांगवे. आणि अक्षय माडगे अव्वल आले. तर १० वर्षाखालील गटामध्ये . मृगया जरांडे आणि वरद चौधरी विजेते ठरले. १६ वर्षाखालील गटात वेदीका पाटील आणि स्वयंम गोळे विजयी झाले.

**हवामान**

पुण्यात थंडीचा कडाका सुरुच आहे. आजप्रमाणे उद्याही किमान तापमान  9 अंश सेल्सियस राहील.तर कमाल तापमानात 30 अंश राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**